Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-2 | March-2015
Available online at www.isrj.org

# अनंताच्या दिंडीतील वारकरी : श्री कल्लाप्पा धुमाळे

डी. व्ही. सुर्यवंशी[1] , अश्विनी धोंडीराम धुमाळे[2]

[1]इतिहास विभाग प्रमूख, सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड
[2]एम. ए. भाग – १

***सारांश*** : भारतीय संस्कृती समस्त विश्वाला आदर्शभूत असून आधारभूत आहे. या भारतवर्षामध्ये हिमालयासारखे थोर अत्युच्च महापुरूष होऊन गेले अशा विचारवंताचा मागोवा घेत आजही महाराष्ट्रभर वारकरी सांप्रदयाचे कार्य अतुलनील असे आहे. ज्या भागवत सांप्रदयाचे अध्वैर्यू कैवल्य साम्राज्य चक्रवती श्री ज्ञानेश्वर महाराज व कलशस्थानी शोभणारे जगतगुरू संत तुकाराम महाराज अशी संत मांदियाळी या महाराष्ट्राला लाभली.

असे संत आवतरीत होण्याकरीता इतिहासाला शतकानुशतके वाट पाहावी लागते. ज्यांच्या वास्तव्याने धरणीमाता देखील पुणित होते.

'कलम पवित्रम जननी कृतार्थ'
वसुंधरा पुण्यवति चेतना ।।'

## *प्रस्तावना :*

समाज विधायक कार्ये करणारे समाज जीवांचे आत्यंतिक कल्याण करणारे उपकारक असे साधू पुरूषदेव दुर्लक्षित असतात. ज्यांच्या भेटीची इच्छा ब्रम्हादी देव करीतात व ते सर्व लोकांना व विश्वाला पूज्य ठरतात.

''त्याची ये भेटीसी आस ब्रम्हादिका ।
पूज्य सकळ लोकां विश्वा झाले ।।

त्यांनी निर्माण केलेली ग्रंथरचना म्हणजे मनुष्य मात्रांना भवसागरातून पायउतार होण्यासाठीची नौकाच होय. अशा संत वाङ्‌मयाचा ज्यांनी अभ्यास करून समाजाला मार्ग दाखविला व अगणित उपकार करण्याचे कार्य थोर संतानी केले. ज्यांनी भगवंतांकडे समाजमने आकर्शित केली त्यांनी जिथे जिथे भक्तीरोपांची लागण केली. त्या वृक्षांना रसरसित अशी फळे लागली आहेत. ते वृक्ष आपली मान उंच करून वारकरी सांप्रदयाची शोभा वाढविताना दिसतात.

## *वारी म्हणजे काय? :–*

''वारी म्हणजे पायी चालणे नव्हे, केवळ तीर्थयात्रा नव्हे, तर ती एक जीवनशैली आहे. जगण्याचे सुत्र आणि जागवण्याचा मंत्र आहे. आत्मसमृध्दी निर्माण करणारी सांस्कृतिक परंपरा आहे. सुमारे ७०० वर्षापूर्वी संतानी भागवत धर्माचा पाया रचला आणि विठ्ठल भक्तीद्वारे वारकरी संप्रदायाची उभारणी केली. भागवत धर्माची उभारणी समभाव वादावर झालेली आहे. संत ज्ञानेश्वरापासून सुरू झालेला, हा विठ्ठलभक्तीचा संप्रदाय मानवतेवर आधारित आहे. म्हणून या सर्वाना विठ्ठल आपला वाटतो. प्रपंचातील आपले गाऱ्हाणे ऐकूण घेणारा नि थकल्या मनाला आश्वासीत करणारा विठ्ठल सर्वांच्या जीवीचा भाव झाला. त्यालाच आराध्यदैवत करून संतानी आपली काव्यरचना केली. आणि महाराष्ट्राला अभंगरूपाने दिव्य शब्दामृत मिळाले. त्याचेच प्राशन वारीच्या काळात वारकरी करतो. आणि भक्तिसागरात न्हाऊन निघतो.

## *वारीचा जन्म :–*

'भद्र जीवन्ता जरणामशीमही।' असे ऋग्वेदात म्हटल्याप्रमाणे भक्तांनीही भगवंताच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. आणि वारी जन्माला आली ' आषाढी कार्तिकी विसरू नका मज। सांगतसे गुज पांडूरंगा।। असे आवाहन साक्षात पांडुरंगाने संत नामदेवाच्या मुखातून केले आहे. संताच्या पादुका

पालखित ठेवून टाळमृदंगाच्या गजरात विठुनामाचा, 'ज्ञानबा तुकाराम' चा गजर घुमवित पंढरीला जाणे हे वारीचे दर्शन, वारीची परंपरा फार जुनी आहे. ती साधारण अकराव्या शतकात रूजली असावी संत नामदेवाच्या घरात पंढरीच्या वारीची परंपरा होती. असे अभंगातून स्पष्ट होते.

### *वारकरी संप्रदयाचे आद्यपीठ :–*

पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे आद्यपीठ आहे. संप्रदायाच्या उदयापासून संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम या सारख्या अनेक संतानी आपल्या भक्तीतून लिखाणातून, आचरणातून वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. वारकरी संप्रदायात संत नामदेव, ज्ञानेश्वर, भानुदास, एकनाथ, तुकाराम व निळोबाराय अशी संत परंपरा चालत आली होती. संत निळोबानंतर संत परंपरा खंडित झालेली दिसून येते. वारकरी संप्रदयाच्या संत परंपरेनंतर वारकरी संप्रदायाचा विकास महाराष्ट्र व देशाच्या अनेक भागात झाला व होत आहे. यामध्ये पंढरपुरातील परंपरागत फड व मठाचे योगदान उल्लेखनीय आहे. वारकरी पंथाचा आचारधर्म पाळून वारकरी संप्रदयाची विचारधारा सर्वसामान्य लोका पर्यंत पोहचविण्याचे काम पंढरपूरातील फड करतात.

### *पंढरीची वारी हा महाराष्ट्राचा वडिलोपार्जित वारसा :–*

पंढरीची वारी हा महाराष्ट्राचा वडीलापार्जित वारसा व वारकरी संप्रदायाचा आचारधर्म आहे. व वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा भागवतधर्म आहे. महाराष्ट्राच्या एकात्मतेचे नि एकरूपतेचे ते प्रतिबिंब आहे. 'इरावती कर्वे यांनी महाराष्ट्राची व्याख्या करताना म्हटले आहे की, 'पंढरीला येणाऱ्या लोकांचे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र', एकूणच वारी हे संपन्न महाराष्ट्राचे आध्यात्मिक ऐश्वर्य आहे. महाराष्ट्राच्या खेडयापाडयातून वाहणारी नि लोकजीवनाशी एकरूप झालेली, ही भावगंगा आहे. भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन वारी करणारा वारकरी हा फक्त भोळाभाबडा भक्त नसून इथल्या आध्यात्मिक जीवनाचा शिस्तबध्द समर्थ पाईक आहे. वारी  हा जीवनाचा अविभाज्य भाग मानून वर्षानुवर्षे त्यात तो मनस्वीपणे सहभागी होत असतो. भजन कीर्तनात दंग होत असतो. गळयात तुळशीची माळ आणि कपाळी चंदनाचा टिळा रेखाटलेला हा वारकरी वाईट विचारांपासून व विकारापासून कटाक्षाने दूर राहून एका अनोख्या शिस्तीने ही वाटचाल करीत असतो. या वाटचालीत कोणालाही जात, धर्म व पंथ विचारला जात नाही. एकमेकांसाठी संबोधन होऊन जाते ते फक्त 'माऊली' या शब्दाचे .....

। पंढरीच्या या वारीत समत्वाचे एकात्मतेचे व व्यापकतेचे दर्शन घडते.

अशाच पंढरीच्या वारीसाठी ज्यांनी आपले जीवन वाहून घेतले ते वारकरी म्हणजे शिरोळ तालुक्यातील दत्तवाड गावाजील ह.भ.प.वै. कल्लाप्पा धुमाळे होय.

### *जन्म व बालपण :–*

श्री कल्लाप्पा धुमाळे यांचा जन्म इ. स. १९२० साली जनवाड ता. चिक्कोडी जि. बेळगांव येथे सामान्य कष्टकरी, गरीब, चर्मकार कुटूंबात झाला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण कन्नड पाचव्या इयत्तेपर्यंत पूर्ण केले. बालवयात त्यांचा ओढा हा वारकरी संप्रदायाकडे होता. हे आई काशीबाईनी ओळखले होते. लहान असताना ते एखाद्या मंदिरात भजन, किर्तन सुरू असेल तर तिथे जाऊन मन लाऊन ऐकण्याचे कार्य करीत असत आणि तेथील व्यक्तींना टाळाची साथ देत असत. हे पाहून आई काशीबाईना फार आंनद होत असे. आणि हे पाहूनच वारीसाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य काशीबाई यांनी केले.

### *वारीसाठी प्रोत्साहन व आशिर्वाद :–*

श्री कल्लाप्पा धुमाळे यांनी अगदी उमेदीत १८ व्या वर्षी इ. स. १९३८ शिरोळ येथे छत्रपती शिवाजी चौकातील विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा पायाभरणी समारंभ करून दत्तवाड येथील त्याचे परमगुरू कै. रामचंद्र भाऊराव पोळ व त्याच्या मातोश्री कै. काशीबाई धुमाळे यांच्यासोबत आषाढी पायी वारीचा श्री गणेशा केला जनवाड येथे लगमाण्णा पाटील यांचे पुराणकथन, शिवपुत्र स्वामीजीचे भजन, नामकीर्तन प्रवचन व शुध्दविचार ऐकत असत. आषाढीच्या पढंरपूर वारीसाठी चंदूरचे रामगोंडा पाटील, जनवाडचे लगमाण्णा पाटील, दत्तवाडचे बसगोंडा पाटील, आपय्या स्वामी व परमगुरू कै. रामचंद्र पोळ यांचे सतत प्रोत्साहन व आशिर्वाद लाभल्याने ते आवर्जून सांगत असत.

### *कल्लाप्पा धुमाळे व त्यांची वारीची यात्रा :–*

१८ व्या वर्षी त्यांनी वारकरी संप्रदयाची दिक्षा घेऊन वारीला प्रारंभ केला वास्कर महाराजांच्याकडून माळ घालून त्यांनी भक्ती मार्गाचा प्रवास सुरू केला. आणि यापुढे काढोळीचे आप्पाजी स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली तो चालू ठेवला. काही वेळेस अडचणी ही आल्या पण त्यांनी पायी पंढरीचा दिनक्रम कधीही चुकविला नाही. १४ आणे  पासून  ५ रूपये, ते गेली १० वर्षे २५ रूपये खर्चामध्ये वारी करतात. एकदा आषाढी एकादशीच्या वेळी सतत तीन दिवस पाऊस पडत होता सोबतीला कुणीच नव्हते तशा पावसात ते एकटेच, पायी पंढरीला गेले.

वारीची आठवण सांगताना ते म्हणतता की, एकदा माझ्या जवळ १४ आणे होते २ आणे देवाला माळ, २ आणे आंधळया पांगळयांना दान, ४ आणे बुक्का, ४ आणे कुंकू व २ आणे करपट्टी अशा १४ आण्याच्या वारीच्या आठवणी ते आपल्या हिशोबासह सांगत असत.

### *वारीस जाताना वास्तव्याची ठिकाणे :—*

वारीला जाताना कळंबी (मिरज) येथे पंचायत समिती, जिनोनो (सोलापूर) व खरडी (सोलापूर) येथे मुक्काम तर येताना कडलास (दत्तवाडचे शिक्षक संभाजी पोळ यांच्या आजीकडे नामदेव लिगाडे कोची (सांगोला) येथे शामराव पाटील व अर्जुनवाड (शिरोळ) येथे भगवान धनवडे यांच्याकडे मुक्काम करत असत. दिवसाकाठी ५० कि. मी. चालुन १५० कि. मी. अंतर ३ दिवसात पूर्ण करतात. कधी चोराचा त्रास नाही. अथवा वारीमुळे पायी चालुन आजारी पडलो नाही. तसेच चहा, बिडी, पान व तंबाखू हया व्यसनापासून कायमचे दूर राहू शकलो असे धुमाळे म्हणत असत.

वारीसाठी निघताना भाकरी किंवा चपाती, १/२ किलो लाडू, चटणी, मीठ, झुणक्याचे पीठ, तांदूळ १/२ किलो ही शिदोरी, पताका, हासबी (वळकटी) घोंगड हयाच वस्तू वारीसाठी सोबत असत व अभंग म्हणत विठ्ठलाची आळवणी करत पंढरी कधी येते, हे समजून येत नाही. असेही ते म्हणत असत.

### *वारकरी धुमाळे यांची खंत :—*

धुमाळे म्हणत इ. स. १९६२ पर्यंत पायी चाालणारे वारकरी भेटत पण इ.स. १९६९ नंतर एकसुध्दा पायी चालणारा वारकरी पंचक्रोशीत भेटत नसल्याची खंत वाटते असे सांगयला विसरत नसत. आजच्या या युगात ही खंत योग्य वाटते. कारण या युगात श्रध्देचा लोप होत चाललेला आहे की काय असे त्यांना वाटते .

श्री कल्लाापा धुमाळे म्हणत असत की वारीसाठी पूर्वी ७५ पैसे करपट्टी द्यावी लागत असे. पण महाराष्ट्र राज्याचे स्वर्गीय मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी पदावर असताना करपट्टी रद्द केल्याने ते समाधान व्यक्त करत असत.

### *कल्लाप्पा धुमाळेचे वास्तव्य :—*

नवमीला पोहल्यानंतर चंद्रभागेत आंघोळ करून विठ्ठलाचे दर्शन, दशमीला वाकरेकडे पायी जाऊन ज्ञानेश्वरीच्या पालखी सोहळयाच्या दर्शनाची ओढ नेत असे. एकादशीला प्रवचन कीर्तन वास्कर वाडयात करत असत. पंढरीत संताबाई चांभार (रोहिदास) यांच्या मठात वास्तव्य करत असत

कल्लाप्पा धुमाळे यांचा महत्वपूर्ण संदेश

स्वत:ला वारीमधून जे काही अनुभव आले ते नेहमीच समाजातील व्यक्तींना सांगत असत. ते म्हणत की माणूस सुखासाठी वणवण करता पण सुख शोधून सापडत नाही. ते माणसाच्या मनात असते, मन —शांत, प्रसन्न असेल तर माणूस सरळ समाधानी राहतो. हे सांगयला ते कधी विसरत नसत स्वत: जवळ जे काही आहे, त्यामध्ये तुम्ही समाधानी रहा असे ते सांगत असत. एकमेकांसमोर नतमस्तक व्हायला तुम्ही शिका, जेणेकरून नम्रता तुमच्या अंगी वास करील. त्याचे हे विचार नेहमीच भारावून टाकणारे वाटत असत.

ज्ञानेश्वर, तुकाराम यांसारख्या संतानी मध्यकाळात वैज्ञानिक दृष्टिकोनातून उध्दार करताना भोंदूगिरी, यज्ञीय कर्मकांडावर कडाडून हल्ला केला. तेच धोरण आजच्या काळात फडानी राबवून सदाचरणाचा आदर्श मार्ग दाखवतच व्यक्ती विकासासाठी कर्तव्याला विशेष महत्त्व दिले. काही फडाचे उपक्रम पाहिले तर असे दिसते की, काळानुसार सुधारणावादी दृष्टीकोन समोर ठेवून वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. याचे परिणाम म्हणजे सर्वसामान्याप्रमाणेच विद्याविभूषित वर्गही या संप्रदायाकडे वळला.

आज पंढरपूरला आषाढी यात्रेला दहा लाखाच्यावर व कार्तिकी, चैत्री, माघवारीला चार लाखभर भाविक येतात. महाराष्ट्रा प्रमाणे इतर राज्यातुनही समाज गोळा होतो. विज्ञान युगातही सर्वच स्तरावरील भाविक एवढया मोठया संख्येने गोळा होतात. (याचे सर्व श्रेय पंढरपुरातील फडांना आहे. देशच्या कानाकोपऱ्यात व परदेशतही वारकरी संप्रदायाचा प्रसार होत आहे.)

### *संदर्भ सूची :—*

१) मनोहर भोसले — ह.भ.प.वै. गणपतराव निळकंठराव मोहिते महाराज व आम्ही
२) विजय बाविस्कर, लोकमत — संपादकीय लेख, एक तरी वारी अनुभवावी, दि. १७ जुलै, २०१३.
३) अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, संशोधन पत्रिका, २० वे अधिवेशन
४) दै. महासत्ता, दि. १५ जुलै, १९९६.
५) दै. पुढारी, दि. १६ जून २००१
६) दै. पुढारी आपले कोल्हापूर, दि. २० जुलै, २००५
७) दै. महासत्ता — इचलकरंजी, दि. २८ जुन २००४
८) मुलाखती — अ) श्री धोंडीराम कल्लप्पा धुमाळे
ब) गौराबाई कल्लाप्पा धुमाळे
क) श्री सोपान कल्लाप्पा धुमाळे